# नौपाडा वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २३० /२०२५ दि. ०८ /१०/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** नौपाडा वाहतूक उप विभागाचे हद्दीत तलावपाळी, चिंतामणी चौक, डॉ. मुस रोड–साईकृपा हॉटेल, मोनिका शॉप तसेच राम मारूती रोड वरील, देवा शॉप समोर, शिवप्रसाद हॉटेल च्या बाजुला राम मारूती रोड,पु.ना. गाडगीळ चौक, रांका ज्वेलर्स व देवा शर्ट्स समोरील रोडवर दिवाळी सणा निमीत्ताने विविध संस्थां तर्फे दिनांक २०/१०/२०२५ रोजी सकाळी "**दिवाळी पहाट** " हा सांस्कृतीक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे वेळी बहुसंख्य नागरीक कार्यक्रमात सहभागी होवून गर्दी होते. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | **१)** डॉ. मुस चौका कडुन गडकरी सर्कलच्या दिशेने येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **डॉ. मुस चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने डॉ. मुस चौकातून सरळ – टॉवर नाका – टेंभी नाका – मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **२)** गडकरी सर्कल कडुन डॉ. मुस चौकाच्या दिशेने जाणाऱ्या सर्वप्रकारच्या वाहनांना **गडकरी सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने गडकरी सर्कल येथून – अल्मेडा चौक – वंदना 'टि' पाईन्ट – गजानन चौक – तीन पेट्रोल पंप – हरिनिवास सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **३)** घंटाळी साईनाथ चौका कडून पु.ना. गाडगीळ चौकाचे दिशेने येणाऱ्या वाहनांना **श्रध्दा वडापाव, घंटाळी चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने घंटाळी चौकातुन घंटाळी देवी पथ रोड मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **४)** गजानन महाराज चौक ते तिनपेट्रोल पंप या सावरकर रोड वरील काका सोहनी पथ या गल्लीतुन पु.ना. गाडगीळ चौकाच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांना **गजानन महाराज चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने तीनपेट्रोल पंप – हरिनिवास सर्कल मार्गे अथवा घंटाळी रोडने इच्छित स्थळी जातील |
| **प्रवेश बंद –** | ५) राजमाता वडापाव सेंटरकडुन गजानन महाराज चौकाच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांना **राजमाता वडापाव सेंटर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने राजमाता वडापाव सेंटर येथुनच गोखले रोड ने इच्छित स्थळी जातील. |

**सदरची अधिसुचना दि. २०/१०/२०२५ रोजी सकाळी ०६:०० वा. पासुन ते दुपारी १४.०० वाजे पावेतो अंमलात राहील.**

सदरची अधिसुचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**<u>प्रत माहितीसाठी सादर</u>**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी,ठाणे.

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.

मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**<u>प्रत</u>** :– <u>पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर</u>

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**<u>प्रत</u>** :– <u>समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे</u>

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**<u>प्रत</u>** :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग व वाहतूक उप विभाग ठाणे शहर.